# जीवन संघर्षातील प्रसन्नपुरूष

संपादक
प्रा. डॉ. विनोद गायकवाड
प्रा. डॉ. संजय कांबळे



# जीवन संघर्षातील प्रसन्नपुरुष

संपादक
प्रा. डॉ. विनोद गायकवाड
प्रा. डॉ. संजय कांबळे

संवाद प्रकाशन, कोल्हापूर

जीवन संघर्षातील प्रसन्नपुरुष
Jeevan Sangharshatil Prasannapurush

संपादक
**प्रा. डॉ. विनोद गायकवाड**
प्रमुख, मराठी विभाग, राणी चन्नमा विद्यापीठ, बेळगाव.
भ्रमणध्वनी- ०९९४५०१५३६४.
**प्रा. डॉ. संजय कांबळे**
मराठी विभाग, राणी चन्नमा विद्यापीठ, बेळगाव.
भ्रमणध्वनी- ०९१६४३५८४८९

प्रकाशक
**अनिल म्हमाने/शोभा चाळके**
संचालक
**संवाद प्रकाशन प्रा. लि.**
८७३, क/२, सी वॉर्ड, सिद्धीश्री प्लाझा,
राजाराम रोड, कोल्हापूर- ४१६००२
मो. ९८२२४७२१०९, ९८९०५५४३४०
Email-anilnirmiti@gmail.com

प्रथमावृत्ती : **१४ एप्रिल २०१९**
मुखपृष्ठ : **गंगाधर म्हमाने**
मुद्रक : **मिरर ऑफसेट, कोल्हापूर**

**ISBN : 978-93-87322-09-7**

**मूल्य : रु. ५१०/-**

५५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषिविषयक धोरण व शेतकरीहित
**डॉ. बी. आर. दहिफळे** /४३८

५६. डॉ. बाबासाहब आंबेडकरांची कृषिनिष्ठता
**प्रा. डॉ. जयद्रथ जाधव** /४४४

५७. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषिविषयक विचार
**प्रा. डॉ. ए. पी. मोरे** /४५६

५८. जलनीती
**प्रा. उदय मुंगुर्डेकर** /४६१

५९. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जलनीती
**प्रा. बाळासोब तराळ/ प्रा. संपदा शिंदे** /४६६

६०. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कोल्हपूर जिल्ह्यातील समकालीन अस्पृश्यता निर्मूलनाची चळवळ
**प्रा. डॉ. दत्ता पाटील** /४७२

६१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक योगदान –
**प्रा. डॉ. आर. डी कांबळे** /४८३

६२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समतेचा विचार : एक चिंतन
**प्रा. जे. एस. जाधव** /४९०

६३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नीतीविषयक विचार
**स्वप्नील बुचडे** /४९६

***

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नीतीविषयक विचार

**स्वप्नील बुचडे**
संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

१

नैतिकतेची मानवी जीवनातील अपरिहार्यता विचारात घेऊन पाश्चात्य आणि भारतीय पातळीवरील विचारवंतानी आपले नीतीविषयक विचार प्रकट केले. आधुनिक मानवतावादी विचार आणि वैज्ञानिक दृष्टी विकसित होण्याला प्राचीन कालखंड तसेच आधुनिक प्रबोधन कालखंड महत्त्वाचा ठरला. प्रबोधनाच्या कालखंडात ज्ञानाचे पुनरुज्जीवन झाले. माणसाचा माणूस म्हणून विचार व्हावा या दृष्टीने विचारवंतानी आणि समाजसुधारकांनी आपल्या भूमिका मांडण्यास सुरवात केली. पाश्चात्य विचारवंतामध्ये सॉक्रेटीसपासून ते कांट, हेगेल, मार्क्स, किर्केगार्ड यांच्यापर्यंत अनेक विचारवंतानी आपल्या विचाराभिव्यक्तीने मानवी नीतीच्या, आचरणाच्या संदर्भात निश्चित भूमिका मांडण्याचा प्रयत्न केला. ज्याचा आधार सबंध देशभरात तत्त्वज्ञानाच्या संदर्भात विचार करत असताना वापरावा लागतो. इ. स. १७८९ साली झालेल्या फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला मानवतावादी दृष्टी दिली. जिच्या मुळाशी आधुनिक मानवतावादाची मूल्ये केंद्रीभूत होती. पण फ्रेंच राज्यक्रांतीपूर्वी हाच विचार भारतीय पातळीवरील गौतम बुद्धाच्या तत्त्वज्ञानात दिसतो. भारतीय नीतीचा विचार हा धर्माच्या तत्त्वज्ञानावर आधारलेला आहे. धर्म जी आचरणाची शिकवण देतो त्यानुसार त्या त्या धर्मातील लोकांचे आचारण होत असते. भारतीय धर्मांचा विचार करता येथे हिंदू हा बहुसंख्याक समुदाय आहे. तर मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, जैन, बौद्ध हे अल्पसंख्याक समुदाय आहेत. त्यांच्या धर्माच्या वकुबाप्रमाणे त्यांची नीती बनली आहे. हिंदू धर्माच्या नीतीमध्ये वर्णव्यवस्था आणि त्यावर बनलेली जातीची उतरंड यामुळे माणसाचे माणूसपण नाकारले जाऊन त्याची जागा विषमताधिष्टीत रचनेने घेतली. असेच धर्माचे जोखड प्रत्येक धर्मात काही प्रमाणात दिसून येतात. पण मानवतावादाची कास

धरून आपली नीती ठरविणारा आणि माणसाच्या माणूसपणाला श्रेष्ठ मानणारा बुद्धाचा विचार हा नीतीच्या संदर्भात वेगळी भूमिका मांडतो. या साऱ्याच्या पार्श्वभूमीवर प्रबोधनाच्या कालखंडात आधुनिक नीतीविचार मांडण्याचा प्रयत्न भारतीय पातळीवर झाला. समाजसुधारकांनी ज्ञानाच्या आधुनिकतेला महत्त्व दिले. ज्यामध्ये मानवतावादी दृष्टी महत्त्वाची होती. या सुधारकांमध्ये राजा राममोहन रॉय, लोकहितवादी, म. फुले, न्यायमूर्ती रानडे, गो. ग. आगरकर, म. विठ्ठल रामजी शिंदे, छ. शाहू महाराज यांच्या नीतीविषयक भूमिका महत्वाच्या ठरतात. याचबरोबर आणखी एका नावाचा आवर्जून उल्लेख करावा लागतो तो म्हणजे भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा. प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय? डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नीतीविषयक विचार? हा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नीतीविषयक विचार पाहण्यापूर्वी नीती म्हणजे काय? याचा थोडक्यात आढावा घेता येईल.

नीतीचा अर्थ सदाचरण, न्याय, योग्य वागणूक असा होय. व्यवहारामध्ये आपले आचरण हे समाजमान्य नीतीनियमांना अनुसरून असावे. ज्याला आपण नीतियुक्त आचरण म्हणतो तीच नीती होय. श्रीनिवास दिक्षित यासंदर्भात म्हणतात कि, *इंग्रजीत नीतीला Morality असा शब्द आहे. लॅटीन भाषेतील Mores या अनेकवचन शब्दापासून तो आला. चौंशी म्हणजे कोणत्याही समाजात प्रस्थापित झालेल्या व त्या समाजास मान्य असलेल्या चालीरीती अथवा वागणुकीच्या रिती होय. नीतीचा उगम समाजात रूढ झालेल्या आणि समाजाच्या मान्यतेस प्राप्त झालेल्या रुढीत आहे.* (दिक्षित श्रीनिवास : १९८२ : १) असे त्यांनी म्हंटले आहे. याच्या पुढे जावून ते म्हणतात की, *नीती हा शब्द नी या धातूपासून बनला आहे. नी म्हणजे नेणे अथवा घेऊन जाने अथवा वाहून नेणे जी आपणास नेईल, आयूष्याच्या मार्गावरून नीट घेउन जाईल अथवा वाहून नेईल ती नीती. आयुष्य कसे न्यावे हे जणू सांगते ती नीती. नीती म्हणजे जीवनाची आदर्श रिती अथवा आदर्श जीवनाची रिती.* (दिक्षित श्रीनिवास : १९८२ : १) असा विचार मांडला. एकूणच आपले आयुष्य चांगले घडवण्यासाठी, आदर्श घडवण्यासाठी नीती उपयुक्त ठरते. नीतीशिवाय जर आपण आपल्या आयुष्याचा विचार करत असू तर त्याला समाजात स्थान प्राप्त होणार नाही ती अनीती बनून आपल्यासमोर येईल.

अशा पद्धतीने नीतीच्या संदर्भात साधारणतः भूमिका मांडता येईल. यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नीतीविषयक विचारांचा आढावा घेता येईल.

२

महात्मा फुलेंच्या कार्यातून स्फूर्ती घेऊन अस्पृश्योद्धाराचे आणि जातीव्यवस्थेवर आघात करण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. समाजाचा एक मुलभूत घटक म्हणून दलितांचे मुलभूत हक्क त्यांना पूर्णतया मिळाले पाहिजेत, अशी त्यांची भूमिका होती. दलितांचा हा अधिकार उच्चवर्णीयांनी डावलल्यामुळे त्यांना हजारो वर्षे शोषण सहन करावे लागले. धर्मावरील विश्वासापोटी दलितांनीही हा अन्याय निमूटपणे सोसला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांमधील न्यूनगंड आणि लाचारी घालवून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

भारतीय धर्माच्या जोखडाने माणसामध्ये निर्माण झालेली दरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अस्वस्थ करत होती. म्हणून त्यांनी धर्माच्या संकल्पनेच्या विश्लेषणाला महत्त्व दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्माचे आणि नीतीसंकल्पनेचे वर्णन करताना म्हंटले आहे की, *धर्म आणि नीतीकल्पना यांच्या संबंधाबाबत एवढे निश्चितपणे सांगता येईल कि, धर्मात ईश्वराच्या कल्पनेचा समावेश अपरिहार्य नसला तरी धर्म आणि ईश्वरकल्पना यात तो आहे. धर्म आणि नीती या दोन्ही गोष्टींचा संबंध जीवन, मृत्यु, जन्म, विवाह आणि माणसांच्या जीवनातील प्राथमिक अवस्थांशी आहे. जीवनाच्या प्रक्रियांना धर्म आधार देतो. तर नीतिमत्ता जीवन सुरक्षित राखण्यासाठी नियम घालून देते. जीवनातील प्राथमिक वस्तूस्थिती आणि प्रक्रिया यांना धर्म पावित्र्यांचे स्वरूप देतो. त्याचप्रमाणे जीवनाच्या सुरक्षिततेसाठी असलेल्या नियमांनाही तो पावित्र्याचे अधिष्ठान देतो. या दृष्टीकोनातून पाहिले तर धर्म आणि नीतिमत्ता यातील संबंध सहजपणे लक्षात येतात. धर्म आणि ईश्वर यांच्यातील नात्यापेक्षा धर्म आणि नीतिमत्ता यातील नाते अधिक जिव्हाळ्याचे आणि स्वाभाविक आहे. धर्म आणि नीतिमत्ता यांचे संबंध कधी प्रस्थापित झाले हेही सांगणे कठीण आहे.* (आंबेडकर डॉ. बाबासाहेब : २००६ : १०) असे म्हणत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्म आणि नीती या गोष्टींचा संबंध जीवन, मृत्यू, जन्म, विवाह आणि माणसाच्या जीवनातील प्राथमिक

अवस्थांशी जोडला. संबंध जीवनामध्ये नीतीची कल्पना किंवा नीतितत्त्वे ही धर्माच्या अनुषंगाने अभिव्यक्त होतात किंवा आचरणात आणली जातात. धर्माशिवाय मानवी जीवन परिपूर्ण असत नाही कारण एकूणच व्यवस्थेत धर्म मानवी जनजीवन नियंत्रीत करत असतो. भारतीय पातळीवर धर्माच्या नाहक विषमताधिष्टीत रचनेमुळे येथील जीवन नियंत्रित केले गेले. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात जोपर्यंत व्यक्ती हिंदू आहे तोपर्यंत तिची जातीशी सांगड घातली जाणार. यावर एकच उपाय उरतो तो म्हणजे हिंदू ही ओळखच नाकारणे तरच अस्पृश्य तसेच उच्चवर्णीय हे एकमेकांशी जातिव्यवस्थेच्या चौकटीबाहेर येऊन व्यवहार करू शकतील. आंबेडकरांनी धर्मांतराचा विचार या भूमिकेतून केला. धर्मांतराचा विचार केल्यानंतर त्यांनी ज्या धर्माची निवड केली तो धर्म मानवतावाद आणि बुद्धिवाद या आंबेडकरांच्या विचारांचा गाभा असणाऱ्या तत्त्वांशी निगडीत होता. समानता, करुणा, अहिंसा याची भाषा बोलणारा आणि तसाच व्यवहार करणारा होता. बौद्ध धर्मासारख्या भारतातच विकसित झालेल्या धर्माचा स्वीकार करून त्यांनी आपली भारतीयत्त्वाची भावनाही अधोरेखित केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातीच्या बाबतीत केलेल्या विश्लेषणाच्या संदर्भात बोलताना जनार्दन वाघमारे म्हणतात की, *दलित आणि पददलितांचे सामाजिक तसेच आर्थिक शोषणाचे मूळ कारण जातीव्यवस्थेतच आहे अशी त्यांची धारणा होती. जातीव्यवस्थेचे समर्थन करण्यावर त्यांनी प्रखर टिका केली आहे. जात हाच हिंदू समाजाच्या इमारतीची कोनशिला (Cornerstone) आहे. ती प्रयत्नपूर्वक उखडली तरच धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक विषमतेला आधार देणारी इमारत जमीनदोस्त करता येईल. असे त्यांचे ठाम मत होते.* (वाघमारे डॉ. जनार्दन : १९९५ : १२२) अशी भूमिका मांडली. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भूमिकेनुसार त्यांनी अस्पृश्यांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला खरी तर जातीव्यवस्थाच कारणीभूत असल्याचे म्हटले. जातीभेदाला पावित्र्य देणाऱ्या धर्मव्यवस्थेवर खरा तर आंबेडकरांचा हल्ला होता. चातुर्वण्यावर आधारलेली हिंदूची समाजव्यवस्था दृढ करणाऱ्या धर्मग्रंथांच्या तथाकथित पवित्र्यावरच त्यांनी कठोर प्रहार केले. मनुस्मृती जाळण्याचे प्रयोजनही खरे तर हेच होते. वरिष्ठ वर्णीय हिंदूची मानसिकता बदलावी हाच त्यामागे हेतू

होता. जातीव्यवस्थेसंदर्भात डॉ. आंबेडकरांनी मुकनायक च्या ११ जानेवारी १९२० च्या अंकात म्हंटले याचा उल्लेख डॉ. जनार्दन वाघमारे करतात त्यानुसार, *हिंदूसमाज हा एक मनोरा आहे व एक एक जात म्हणजे त्याचा एक एक मजलाच होय. पण लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे की, या मनोऱ्यास शिडी नाही आणि म्हणून एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्यास मार्ग नाही. ज्या मजल्यावर ज्यांनी जन्मावे त्याच मजल्यावर त्यांनी मरावे. खालच्या मजल्यातला इसम, मग तो कितीही लायक असो, त्याला वरच्या मजल्यावर प्रवेश नाही. व वरच्या मजल्यातला माणूस मग तो कितीही नालायक असो, त्याला खालच्या मजल्यात लोटून देण्याची प्राज्ञा नाही.* (वाघमारे डॉ. जनार्दन : १९९५ : १०८) अशा बंद समाजात विषमतेशिवाय दुसरे काय आढळणार? हा मनोरा जमीनदोस्त करण्याचा आग्रह डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सतत धरला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडले त्या भूमिकेचे विश्लेषन करताना पुढे डॉ. जनार्दन वाघमारे म्हणतात कि, *खरे तर जातीव्यवस्था ही लोकशाही मूल्यांच्या विरोधात ठामपणे उभी असते. लोकशाही समाजव्यवस्थेचा प्राणबिंदू म्हणजे व्यक्तीस्वातंत्र्य! डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्तीस्वातंत्र्याच्या मूल्यांसाठी आयुष्यभर संघर्ष केला. एक व्यक्ती एक मूल्य हे सूत्र आमच्या हाती दिले.* (वाघमारे डॉ. जनार्दन : १९९५ : १०८) यानुसार डॉ. वाघमारे यांनी डॉ. आंबेडकरांच्या व्यक्ती स्वातंत्र्याच्या माध्यमातून नीतीविषयक जागृती केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या मुळाशी असलेल्या? एक व्यक्ती एक मूल्य? या महत्त्वपूर्ण भूमिकेलाही स्पर्श केला.

डॉ. वाघमारे यांनी मांडलेल्या भूमिकेनुसार असे म्हणता येईल कि, समाजाची रचनाच अशी असावी की, त्यातील प्रत्येक व्यक्तीला आणि समाजघटकाला आपल्या उन्नतीसाठी पुरेसा वाव मिळावा, आणि तो उपलब्ध करून द्यायच्या असेल तर सामाजिक वास्तुशास्त्रात स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या तीन मूल्यांचा समावेश पायाभूत सिद्धांत म्हणून केला जाणे आवश्यक ठरते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटना तयार करण्यासाठी जे परिश्रम घेतले त्यात या तत्वांचा जाणीवपूर्वक अंतर्भाव करण्यात आला आहे. जिथे ही तीन मूल्ये किंवा तत्त्वे एकत्रित येतात, तिथे न्याय प्रस्थापित होतो. अशी भूमिका मांडता येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जातीव्यवस्थेच्या संदर्भात म्हणतात की, *जातीव्यवस्था ही कोणताही शोक न करता गाडून टाकण्याच्या लायकीची आहे. परंतु तिच्या जागी कोणती व्यवस्था निर्माण करायची ? आंबेडकर यासाठी दोन परस्परव्यावर्तक सामाजिक आदर्शाचा विचार करतात एक चातुर्वण्यावर आधारित (जातीव्यवस्थेपासून अलग अशी) समाजाची पारंपरिक संकल्पना आणि दुसरी स्वातंत्र्य, समता व बंधूता यावर आधारित समाजाची आधूनिक संकल्पना. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यातल्या दुसरीचा स्वीकार केला.* (रेगे मे. पू. : २००२ : १९६) यानुसार असे म्हणता येईल कि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारात मानवतावादी दृष्टी होती. ते व्यक्ती स्वातंत्र्याला महत्त्व देतात. व्यक्तीची प्रतिष्ठा, सामाजिक न्याय, संधी-समानता आणि बंधूता या तत्त्वांचा जसा स्वतंत्र भारताच्या संविधानात समावेश करण्यात आला तसा तो सामाजिक रचनेमध्ये होण्याला त्यांनी महत्त्व दिले. अस्पृश्यांनी समाजाच्या मुख्य प्रवाहाचाच भाग बनावे, त्यांना अलग ठेवले जाऊ नये यासाठी जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. शिक्षण अस्पृश्य जातीच्या लोकांसाठी उपलब्ध करून दिले आणि त्यांच्यातील न्यूनगंडाची भावना काढून टाकण्याचा प्रयत्न केला. याचबरोबर चवदार तळ्याचा सत्याग्रह, मंदिर प्रवेशाची चळवळ यातून त्यांनी खऱ्या अर्थाने अस्पृश्य समाज इतर जातींच्या लोकांसमवेत राहिला पाहिजे, वावरला पाहिजे यासाठी प्रयत्न केले. या सर्वातून आपल्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नीतीविषयक भूमिकांचा परामर्श घेता येतो.

**३**

स्वतंत्र भारताच्या घटनेच्या बांधणीच्या रूपाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी माणसाला माणूस म्हणून वागवणाऱ्या नीतीचा पुरस्कार केला. संविधानाच्या मुलभूत हक्काकडे पहिले तर आपल्याला त्यांनी मांडलेला नीतीविषयक विचार किती आधुनिक आणि पुरोगामी होते याची प्रचीती येते. संविधानामध्ये मांडलेल्या या हक्कामुळे माणसाचे आचरण सुरक्षित केले गेले. या हक्कामध्ये, १- *समानतेचा हक्क* (कायद्यापुढे समानता, धर्म, वंश, जात, लिंग, किंवा जन्मस्थान या कारणावरून भेदभाव करण्यास मनाई), २- *स्वातंत्र्याचा हक्क* (भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शांततेने व विनाशस्त्र जमण्याचा हक्क, अधिसंघ

व संघ बनविण्याचा हक्क, भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र मूक्तपणे संचार करण्याचा हक्क, भारताच्या कोणत्याही भागात राहण्याचा व स्थायिक होण्याचा हक्क, कोणताही पेशा आचरण्याचा हक्क अथवा व्यवसाय, व्यापार किंवा धंदा चालविण्याचा हक्क), ३- *शोषणाविरुद्धचा हक्क* (माणसांचा व्यापार व वेठबिगारी यांना मनाई, चौदा वर्षाखालील कोणत्याही बालकास कोणत्याही खाणीत किंवा धोक्याच्या ठिकाणी कामावर ठेवण्यास मनाई), ४- *धर्मस्वातंत्र्याचा हक्क* (सार्वजनिक सुव्यवस्था नीतिमत्ता व आरोग्य व या भागातील अन्य तरतुदींच्या अधिनतेने सद्सद्विवेकबुद्धी स्वातंत्र्याला आणि धर्म मुक्तपणे प्रकट करण्याच्या आचरण्याच्या व त्याचा प्रचार करण्यासाठीच्या अधिकाराला सर्व व्यक्ती सारख्याच हक्कदार आहेत.) ५- *सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्क* - (भारताच्या राज्यक्षेत्रात किंवा त्याच्या कोणत्याही नागरिक गटास आपली स्वतःची वेगळी भाषा, लिपी, संस्कृती असेल त्याला ती जतन करण्याचा हक्क असेल) ६- *सांविधानिक उपाय योजनांचा* हक्क (तिसऱ्या भागाने प्रदान केलेले हक्क बजावण्यासाठी सुमचीत कार्यवाहीद्वारे सर्वोच्च न्यायालयास अर्ज विनंती करण्याच्या हक्काची हमी देण्यात आली आहे), (डॉ. बाबासाहेब आंबेडकर : २००७ : ७४-८३) या हक्कांचा समावेश करण्यात आला. या हक्कांच्या मांडणीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नीतीविषयक विचार समजून येतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या निर्मितीच्या मुळाशी? एक व्यक्ती एक मूल्य? हे तत्त्व ठेवले. ज्यातून मानवाला प्रतिष्ठा देणारा विचार पुढे आला. माणसाला माणूस म्हणून वागवण्याचा, आचरण करण्याचा विचार पुढे आला. त्यातूनच स्वातंत्र्य, समता, बंधूता व न्याय ही विचारांची आणि मूल्यांची बैठक निर्माण झाली. माणसाचा आणि मानवी जीवनाचा विचार हा महत्त्वाचा आणि श्रेष्ठ होय. मानवी जीवन हे पारलौकिक नसून ते इहलोकातील व भौतिक जीवनाच्या संदर्भात महत्त्वपूर्ण आहे. ज्या नैतिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक मूल्यव्यवस्थांचा विचार करायचा, त्याचे केंद्र व उद्दिष्टही मानव हेच स्वीकारले होते. मध्ययुगामध्ये ईश्वरकेंद्री जीवनविचार होता आणि माणसाच्या पारलोकिक जीवनाच्या संदर्भात सर्व विचार केला जात होता. परंतु विवेकवाद आणि इहवाद यांच्यामुळे परलौकिक जीवन, ईश्वरकेंद्री विचार या गोष्टी दूर झाल्या आणि विचार सुरु झाला तो

माणसाचा, माणसाला सर्व गोष्टींच्या केंद्रस्थानी ठेवून. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या मुळाशी हाच विचार मांडला आणि त्यातून आधुनिक मूल्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही माणसाला आणि समाजाला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी मिळाली. हाच मानवतावादी विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नीतीविषयक विचार म्हणून बघता येईल.

४ आधुनिक संविधानिक मूल्याच्या रूपाने नवा नीतीविषयक विचार रुजविण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेला भारतीय संविधानातील नीतीविषयक विचार हा निश्चितच आधुनिक विचारांची मांडणी करतो. राष्ट्रीय नीतीच्या रूपाने या संविधानामुळे माणसाच्या अभिव्यक्तीला आणि स्वातंत्र्याला केंद्रित ठेवून नीतीचा विचार मांडला गेला. ज्यामुळे माणसाला संरक्षणाचे कवच मिळाल्याची जाणीव निर्माण झाली. आणि प्रत्येक व्यक्तीला यानुसार आचरण करणे बंधनकारक झाले. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेकरांनी मांडलेला नीतीच्या संदर्भातील विचार हा निश्चितच नवा आणि मानवतावादाची मांडणी करणारा आहे असे म्हणता येते.

**संदर्भ : –**


१) आंबेडकर (डॉ.) बाबासाहेब, २००६ : *हिंदू धर्माचे तत्त्वज्ञान*, सुगावा प्रकाशन, पुणे, द्वितीय आ.

२) आंबेडकर (डॉ.) बाबासाहेब, २००७ : *भारताचे संविधान*, मिलिंद प्रकाशन वर्धा

३) दीक्षित श्रीनिवास, १९८२ : *नितीमिमांसा*, मराठी तत्त्वज्ञान महाकोश मंडळ, साधना प्रेस, पुणे, प्र. आ.

४) रेगे मे. पू. २००२ : *विवेक आणि न्याय : आधुनिक महाराष्ट्रातील प्रबोधन पर्व*, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र. आ.

५) वाघमारे (डॉ.) जनार्दन, १९९५ : *समाजपरिवर्तनाच्या दिशा*, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ.


***